# कोलंबियन एक्सचेंज
# सोळाव्या शतकातील महासाथ


**लेखक : नीलिमा सहस्रबुद्धे**



**कोरोना महासाथीमुळे जगभरात मोठ्या प्रमाणात उलथापालथ झालेली आपण पाहिली. या पूर्वी अशा अनेक महासाथी येऊन गेल्या आहेत. कोरोना महासाथ सुरू झाली त्याला या वर्षी ५ वर्षं पूर्ण झाली. त्या निमित्ताने, 'कोलंबियन एक्स्चेंज' या अत्यंत वेगळ्या अशा महासाथीविषयी जाणून घेऊ या.**



कोरोनामुळे होत असलेल्या कोविडची महासाथ आता इतिहासात नोंदली गेली आहे. अर्थात त्याचे काही परिणाम अजूनही आपल्याला भोगावे लागत आहेत. ही साथ फक्त आपल्या शहरात- राज्यात नव्हती, तर देशोदेशी पसरून त्यात दोन कोटी सत्तर लाख लोक मृत्युमुखी पडले असा अंदाज आहे.

जगभरात पसरलेली ही काही पहिली महासाथ - पँडेमिक नव्हती तर या आधीही प्लेग, कॉलरा या आजारांच्या महासाथी येऊन गेल्या होत्या. याबद्दल शोधत असताना एक फार चांगला लेख सापडला. सलोनी दत्तानी आणि इतर यांनी लिहिलेला. 'Our World in Data' या वेबसाईटवर. हा लेख ७ डिसेंबर २०२३ ला लिहिलेला आहे.

मुळात पँडेमिक म्हणजे काय, एपिडेमिक म्हणजे काय, आजवरच्या इतिहासात येऊन गेलेल्या या साथी- महासाथींच्या व्यवस्थित नोंदी नसताना आज आपण त्याबद्दल खात्रीशीर

कसे सांगू शकणार, त्यावर आजच्या संशोधकांनी काय उपाय शोधले, कसे संशोधन केले ... याबद्दल त्यांनी मांडणी केली आहे.

या लेखात पुढे कालानुक्रमे आलेल्या महासाथींचा आलेख तयार केलेला आहे.




*महासाथींचा कालानुक्रम (टाईम लाईन)आणि त्या त्या साथीमुळे झालेले मृत्यू*

*स्रोत :* https://ourworldindata.org/historical-pandemics

या आलेखात सगळयात जुन्या प्लेगच्या (*ब्लॅक डेथ* ) साथीचा उल्लेख आहे. १३४७ ते १३५३ या सहा वर्षात युरोपातल्या लोकसंख्येपैकी ५० ते ६० टक्के म्हणजे साधारण पाच कोटी लोक मरण पावले. प्लेगच्या अशा साथी १६९० पर्यंत परत परत येतच राहिल्या. याला दुसरी महासाथ म्हणतात. (तिसऱ्या प्लेगच्या साथीबद्दलचे उल्लेख आपणही जुन्या लेखसंग्रहातून वाचले असतील. पुण्यात प्लेगचे उंदीर पडू लागले, गाव सोडून बाहेर राहायला जावे लागले, दरम्यान ब्रिटिश सोजीरांनी घरात घुसून लोकांना बाहेर काढल्याबद्दलचा असंतोष... त्यावर केसरीत आलेले लेख वगैरे.) तिसरी प्लेगची साथ १८९४ ते १९४० दरम्यान आली होती. त्यात दीड कोटी लोक मरण पावले.



*१४व्या शतकातली ' ब्लॅक डेथ' ही सगळ्यात जुनी प्लेगची साथ*
*स्रोत :*
https://www.britannica.com/event/Black-Death/Effects-and-significance

१८१७ पासून १९४७ पर्यंत कॉलराच्या महासाथी सहा वेळा येऊन गेल्या. १८६५ ते १९४७च्या दरम्यान या महासाथीमुळे भारतात घडलेले मृत्यू दोन कोटी तीस लाख इतके होते. १९६१ नंतर २०२१ पर्यंत जगभरात कॉलऱ्यामुळे झालेले मृत्यू नऊ लाख इतके आहेत. याचप्रमाणे इन्फ्ल्युएन्झा महासाथीमध्ये प्रचंड प्रमाणात मृत्यू घडलेले आहेत. हा आलेख वाचत जात असताना एक वेगळा उल्लेख दिसला - कोलंबियन एक्स्चेंज ! १४९२ ते १६०० या दरम्यान आलेल्या महासाथीचे नाव 'कोलंबियन एक्सचेंज' असे दिले आहे. या १०० वर्षांत नेटिव्ह अमेरिकन लोकांची संख्या ९० टक्क्यांनी कमी झाली. कोलंबियन एक्सचेंज

म्हणजे काय आणि त्यामुळे अमेरिका खंडातले मूळ निवासी इतक्या मोठ्या प्रमाणात कसे काय मारले गेले - हे जरा समजावून घेऊ. १४९२ मध्ये इथली लोकसंख्या पाच कोटी चाळीस लाख एवढी होती. १०० वर्षांत चार कोटी ऐंशी लाख इतकी माणसे मारली गेली!! हे किती भयंकर आहे !

या आलेखात या मृत्यूची कारणे दिली आहेत ती अशी : परचक्र, युद्ध, गुलामगिरी यासह देवी, कॉलरा, गोवर, डिफ्थेरिया, गालगुंड, फ्ल्यू, टायफॉईड हे सर्व आजार या खंडात संक्रमित झाल्याने हे मृत्यू घडले.

**कोलंबियन एक्सचेंज -** १४९२ मध्ये स्पॅनिश मोहिमेवर निघालेल्या कोलंबसाला नवे जग, नवी भूमी सापडली. पुढच्या काही वर्षांत अमेरिका - युरोप - आफ्रिका हे आजवर स्वतंत्र असलेले खंड समुद्रमार्गे जोडले गेले. त्यामुळे माणसांची येजा चालू झाली. त्यांच्यात युद्धे, व्यापार हे तर घडतच, शिवाय त्यादरम्यान वनस्पती, प्राणी आणि रोगराई यांची प्रचंड प्रमाणात देवाणघेवाण झाली.



*कोलंबसचा नव्या भूमीवर प्रवेश*
*स्रोत :*
https://www.britannica.com/event/Columbian-exchange

जहाजांमधून नवी माणसं आली, त्यांच्याबरोबर त्यांचं खाणंपिणं, त्यांचे पक्षी-प्राणी देखील आले. नव्या जुन्यांचे संपर्क, संघर्ष, व्यापार आणि युद्धे यादरम्यान काही वनस्पती, पिके आणि फळे नव्या जगात आली. काही तिथून जुन्या जगात युरोप, आफ्रिका आणि आशियात नेली गेली.

१) शेळ्या, मेंढ्या, गुरे, डुकरे आणि घोडे हे युरोपकडून अमेरिकेत आले. अमेरिकेतल्या गवताळ कुरणांमध्ये गुरं आणि घोड्यांना रान मिळालं. तिथे त्यांची संख्याही वाढली आणि नंतर ही सगळी जनावरं पाळीव न राहता, तिथलीच होऊन गेली. डुकरांची संख्या प्रचंड वाढली. फक्त शेळ्या मेंढ्यांचे कळप नवाजो आणि न्यू मेक्सिको इथल्या मूळ निवासींनी बाळगले, वाढवले. या सर्व नव्या प्राण्यांमुळे इथल्या लोकांसाठी लोकर, कातडी, मांसाची सोय झाली. घोडे आणि बैल नांगरणीसाठी, वाहतुकीसाठी वापरले जाऊ लागले. आता चाके लावलेल्या गाड्या वापरात आल्या. गाढवे, खेचरेदेखील ओझ्यासाठी मिळाली. सुबत्ता वाढू लागली. (इतके दिवस इकडे फक्त लामा होते). शेळ्या, मेंढ्या, डुकरांमुळे पिकांची नासाडी होऊ लागली आणि शेतकरी विरुद्ध गुराखी अशा जमातींमध्ये नव्याने संघर्ष - युद्ध पेटू लागली. भांडणांना, राज्य वाढवायला नवी कारणे मिळाली.



*मेंढ्यांचा कळप घेऊन चाललेला घोडेस्वार (ॲरिझोना - उटाह येथील मॉन्युमेंट व्हॅली, नवाजो नॅशनल पार्क)*
*स्रोत :*
https://www.britannica.com/event/Columbian-exchange

२) अमेरिकेतून नवी पिके बाहेर गेली - बटाटे, रताळे, कसावा, मका, टोमॅटो, भोपळे, भुईमूग, अननस, मिरची आणि तंबाखू ! जिथे इतर पिके येत नव्हती, तिथे मका चांगला पिकू लागला. त्यामुळे दुष्काळावर मात करता आली, अन्नधान्याची सुबत्ता झाली आणि युरोप-चीनमध्ये लोकसंख्या वाढली. (विशेषतः १७०० सालानंतर). कमी पावसाच्या प्रदेशात मक्याला

महत्त्व आले. आफ्रिकेत तर या नव्या पिकांमुळे चित्रच बदलले! मुळात इथली ज्वारी, बाजरी, सुरण व केळी यांच्यापेक्षा मका - मक्याचे पीठ साठवून ठेवणे इथल्या सत्ताधाऱ्यांना सोपे झाले. आपल्याशी एकनिष्ठ जनतेलाच फक्त ते अन्न द्यायचे, अशी सोय झाली. त्यामुळे मोठी राज्ये, मोठी सत्ता, मोठी सैन्ये निर्माण होऊ लागली. व्यापाऱ्यांना हे अन्न टिकवून, घेऊन लांब लांबच्या सफरीवर जाणे शक्य होऊ लागले. त्यामुळे गुलामांचा व्यापार प्रचंड प्रमाणात वाढला. (विशेषतः १६०० सालानंतर). लांब लांबच्या भागातून माणसांचे गुलामांचे तांडे चालत न्यायचे, मग जहाजांमधून प्रवास करत अमेरिकेत पोहोचायचे - यादरम्यान लागणाऱ्या टिकाऊ अन्नाची सोय झाली. अमेरिकेत आलेल्या नव्या पिकांमध्ये द्राक्षे, सुरण, कलिंगडे, कॉफी ही आफ्रिकेतून आली. शिवाय गहू, तांदूळ, राय, बार्ली आणि कॉफी आशियातून आली. या पिकांमुळेही गुलामांचा व्यापार वाढत गेला. तंबाखू - कॉफी या पिकांच्या शेतीसाठीच गुलाम आफ्रिकेतून आणले गेले. मुख्यतः गुलामांच्या जीवावर ही शेती अमेरिकाभर पसरली. नवी जमीन पिकांखाली आणली गेली.



*युगांडा येथे केलेली कसावा पिकाची लागवड*

स्रोत : https://www.britannica.com/event/Columbian-exchange

३) १४९२ पर्यंत अमेरिकेत एकमेकांपासून लागण होणारे देवी, गोवर, इन्फ्लुएंझा, गालगुंड, डांग्या खोकला, टायफस हे रोग नव्हते. आफ्रिका आणि युरेशिया मधल्या दाट वस्त्यांमध्ये हे आजार कायम असत. सहा वर्षांखालची एक चतुर्थांश ते एक द्वितीयांश मुले याला बळी

पडत. पण उरलेल्यांना यापासून प्रतिकारशक्ती मिळत असे. पीतज्वर आणि *फॅल्सिपेरम* मलेरियादेखील अमेरिकेत आफ्रिकेतून आले. या सर्व आजारांच्या साथी, हिंसा, मानसिक व शारीरिक ताण या सगळ्यांचा एकत्रित परिणाम भयंकर होता. कॅरिबियन भागात सर्वात जास्त संकट आले. इथल्या बेटांवरच्या सोळाशे जमातींमधले ९९% लोक यामुळे मारले गेले. १६५० पर्यंत पूर्ण अमेरिकेतली ५० ते ९५ टक्के मूळ लोकसंख्या मृत्युमुखी पडली.

*अधिक माहितीसाठी दोन्ही मूळ लेख जरूर वाचा.*

१. https://ourworldindata.org/historical-pandemics

२. https://britannica.com/topic/the-columbian-exchange

§§§

---

**लेखक : नीलिमा सहस्रबुद्धे**, शैक्षणिक संदर्भ संपादक गटात सहभागी.

**इ-मेल :** neelimasahasrabuddhe@gmail.com

***(कळीचे शब्द :- कोरोना, महासाथ - पँडेमिक, साथीचे रोग, कोलंबियन एक्स्चेंज, अमेरिका, कोलंबस, Corona, Pandemic, Epidemic diseases, Columbian Exchange, America, Columbus)***